सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १२९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १ जुलै २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणारे

# लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर दक्षिण मुख्यालयाचे नवे प्रमुख



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१पुणे :** लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाच्या प्रमुख पदी (आर्मी कमांडर) लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांची नियुक्ती करण्यात आली. पुष्कर यांनी बुधवारी पदाची सूत्रे स्वीकारली. तर मावळते प्रमुख लेफ्टनंट जनरल संदीप जैन यांची लष्कराचे उपप्रमुख म्हणून नियुक्ती झाली आहराष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे (एनडीए) माजी विद्यार्थी असलेले लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर डिसेंबर १९८८ मध्ये ‘७४ आर्मर्ड रेजिमेंट’मध्ये रुजू झाले होते. ते गेल्या चार दशकांहून अधिक काळ लष्करात कार्यरत असून त्यांनी आकापर्यंतच्या सेवा काळात विविध भौगोलिक आणि धोरणात्मक वातावरणात अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यात त्यांनी आर्मर्ड रेजिमेंट, स्वतंत्र आर्मर्ड ब्रिगेड, पायदळ तुकडी आणि स्ट्राईक कॉर्प्सचे नेतृत्व केले आहे. तसेच स्ट्राईक कॉर्प्समध्ये कर्नल मिलिटरी सेक्रेटरी, पश्चिम क्षेत्रातील आर्मर्ड डिव्हिजनचे कर्नल जनरल स्टाफ, स्ट्राईक कॉर्प्सचे ब्रिगेडियर क्वाटरमास्टर जनरल, ऑपरेशनल कमांडचे ब्रिगेडियर जनरल स्टाफ, आर्मर्ड कॉर्प्सचे अतिरिक्त महासंचालक, प्रादेशिक सेनेचे (टेरिटोरियल आर्मी) महासंचालक, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए), खडकवासला येथे प्रशिक्षक (इन्स्ट्रक्टर) म्हणूनही सेवा दिली आहे.पुष्कर यांना भूतानमधील भारतीय लष्करी प्रशिक्षण पथकाचा (आयएमटीआरएटी) भाग म्हणून आणि मॉस्को येथील भारतीय दूतावासात ‘डिफेन्स अँड मिलिटरी अटॅचे’ (आर्मेनिया आणि बेलारूसच्या अतिरिक्त जबाबदारीसह) म्हणून दोन आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याचा अनुभव आहे. डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज, कॉलेज ऑफ डिफेन्स मॅनेजमेंट आणि भारतातील प्रतिष्ठित नॅशनल डिफेन्स कॉलेजचे पदव्युत्तर पदवीधर आहेत. त्यांच्या नागरी शैक्षणिक अर्हतेमध्ये ‘डिफेन्स अँड स्ट्रॅटेजिक स्टडीज’मध्ये पदव्युत्तर पदवी, ‘मॅनेजमेंट स्टडीज’मध्ये पदव्युत्तर पदवी आणि ‘डिफेन्स अँड इंटरनॅशनल रिलेशन्स’मध्ये एम.फिल. केले आहे. त्यांच्या योगदानासाठी अति विशिष्ट सेवा पदक, विशिष्ट सेवा पदक, चीफ ऑफ आर्मी स्टाफ प्रशस्तीपत्र आणि तीन आर्मी कमांडर प्रशस्तीपत्रांनी सन्मानित करण्यात आले आहे.पदभार स्वीकारल्यानंतर लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यांनी ‘दक्षिण कमांड युद्ध स्मारका’वर श्रद्धांजली वाहिली. दक्षिण मुख्यालयात त्यांना ‘गार्ड ऑफ ऑनर’ देण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये उच्च पातळीवरील सज्जता राखण्यासाठी दक्षिण कमांडच्या वचनबद्ध आहे. तिन्ही दलांमधील समन्वय, स्वदेशी क्षमतांचा विकास आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा जलद अंतर्भाव यावर भर राहणार आहे. भारतीय लष्कराच्या गौरवशाली परंपरांचे जतन करत सर्व सैनिक देशाच्या सेवेसाठी उत्कृष्टतेचे सर्वोच्च निकष राखतील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# पांढरकवड्यात अठरा लाखांचा अवैध व मुदतबाह्य कृषी साठा जप्त

### अमरावती विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक, यवतमाळचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या नेतृत्वात धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१यवतमाळ :** जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यात कृषी विभागाने खैरगाव (दे.) येथील एका रहिवासी घरावर छापा टाकून विनापरवाना साठवून ठेवलेला सुमारे १७ लाख ८२ हजार १३५ रुपये किमतीचा अवैध, प्रतिबंधित आणि मुदतबाह्य कीटकनाशके, रासायनिक खते तसेच जैवउत्तेजकांचा साठा जप्त केला. ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून कृषी क्षेत्रात या कारवाईमुळे मोठी खळबळ माजली आहे. पांढरकवडा पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय कृषी विभागाच्या



भरारी पथकाने संयुक्तपणे खैरगाव येथील रहिवासी यश गजानन शिवनवार (२६) यांच्या घरी अचानक छापा टाकला. या तपासणी दरम्यान आरोपीने स्वतःच्या बेकायदेशीर आर्थिक फायद्यासाठी कोणताही वैध परवाना नसताना घरात हा घातक साठा दडवून ठेवल्याचे उघडकीस आले. कृषी विभागाने पंचांसमक्ष एकूण २ हजार २८५ किलो मुद्देमाल जप्त करून तात्काळ सीलबंद केला आहे.जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये प्रामुख्याने अत्यंत घातक आणि मुदत संपलेल्या कीटकनाशकांचा समावेश आहे. एकूण ३५८.५५ किलो वजनाची मुदतबाह्य कीटकनाशके जप्त करण्यात आली असून, बाजारभावानुसार त्यांची किंमत ८ लाख ४९१ रुपये आहे. या कीटकनाशकांच्या वापरामुळे पिकांचे आणि जमिनीचे मोठे नुकसान होऊ शकत होते.

याशिवाय, पथकाने घरातून १ हजार ७३५ किलो वजनाचा अनाधिकृत रासायनिक खतांचा साठाही हस्तगत केला आहे, ज्याची किंमत ४ लाख ५६ हजार ५० रुपये आहे. तसेच, पिकांची वाढ जलद गतीने करण्याचा दावा करणारी विविध प्रकारची अनधिकृत जैवउत्तेजके जप्त करण्यात आली आहेत. या जैवउत्तेजकांचे एकूण वजन १८८.१५ किलो असून त्याची किंमत ५ लाख २२ हजार ५९४ रुपये एवढी आहे.

ही यशस्वी आणि धडक कारवाई राज्याच्या कृषी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये अमरावती विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक, यवतमाळचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक तसेच पांढरकवडा, कळंब आणि मारेगाव येथील कृषी अधिकाऱ्यांच्या विशेष भरारी पथकाने सहभाग घेतला. खरिपाच्या ऐन हंगामात शेतकऱ्यांना बनावट आणि मुदतबाह्य खते किंवा कीटकनाशके विकून फसवणाऱ्या टोळ्यांविरुद्ध यापुढेही अशीच कडक मोहीम राबवली जाईल, असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

# शरद पवारांच्या तालमीत तयार झालेले अहिर योग्य वेळी गोल करतात, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई:-** ठाकरे गटाने ज. मो. अभ्यंकर यांचा अर्ज मागे घेतल्याने सचिन अहिर यांची विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली. याप्रसंगी सचिन अहिर यांचे कौतुक करताना सचिन अहिर हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या तालमीत तयार झालेले असल्याने ते योग्यवेळी गोल करतात. योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपसभापती पदाचा अर्ज मागे घेतल्याबद्दल विरोधकांचे आभार मानले. १९९९ साली मी आणि सचिन अहिर सोबत निवडून आलो होतो. अहिर हा शब्दचा अर्थ गोपालक आणि निर्भीड असा आहे. मला त्यांच्याबाबत अनुभव आहे ते निर्भीडपणे काम करणारे व्यक्ती आहे, असं कौतुक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. उपासभापतीपदाच्या खुर्चीवर बसल्यावर प्रत्येकाला न्याय द्यायचा असतो. सचिन अहिर ते काम करतील. आतापर्यंत उपसभापती म्हणून ज्यांनी काम केले त्या निलम गोऱ्हे यांचे



देखील अभिनंदन करतो. प्रसंगी कठोर भूमिका घेणाऱ्या त्या आहेत. मधल्या काळात संघर्षचा काळ होता त्यावेळी देखील त्यांनी चांगले काम केले असे मुख्यमंत्री म्हणाले.सचिन अहिर यांची कारकीर्द म्हणजे चळवळीतून तयार झालेला कार्यकर्ता अशी ओळख आहे. कामगारांसाठी त्यांनी काम केले, मिल मजदूर संघाचे पदाधिकारी म्हणून काम केले आहे. १९९९ साली विधानसभेत आमदार झाले. त्यानंतर ३ वेळा निवडून आले. २००९ साली राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले. समर्पक उत्तर देणारा मंत्री म्हणून सचिन भाऊंची ओळख होती. महत्त्वाचा प्रश्न आला की काय अपेक्षा आहे असं देखील म्हणायचे, अशी आठवणही देवेंद्र फडणवीसांनी करून दिली. सचिन अहिर यांची दहीहंडी विशेष चर्चेत असायची. सामाजिक क्षेत्रात चांगलं काम आहे. योग्यवेळी योग्य निर्णय घेण्यात ते हुशार आहेत.-

# मुंबई लुटली, राम मंदिरातील पैशांवरही डल्ला

## नाना पटोलेंची भाजप-महायुतीवर सडकून टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई** चेंबूरमध्ये शाळेच्या बसवर झाड कोसळून ११ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेवरून महाराष्ट्र काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबई महापालिकेतील भ्रष्टाचारामुळेच ही दुर्घटना घडल्याचा आरोप करत त्यांनी या प्रकरणाची न्यायालयाने स्वतःहून दखल घ्यावी, अशी मागणी केली. याचवेळी त्यांनी राम मंदिर निधीतील कथित गैरव्यवहार, शेतकरी कर्जमाफी आणि विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींना फोडण्याच्या राजकारणावरूनही भाजप आणि महायुती सरकारवर निशाणा साधला.

नाना पटोले म्हणाले की, भाजप आणि महायुतीने मुंबईच्या विकासाचे आश्वासन देत मुंबई



महापालिकेवर नियंत्रण मिळवले. मात्र, देशातील सर्वात श्रीमंत महापालिकेचा निधी विकासासाठी न वापरता भ्रष्टाचारासाठी वापरण्यात आला.

मुंबईकरांच्या कराच्या पैशातून महापालिकेत आणि राज्य सरकारकडे मोठा निधी जमा होतो. पण या पैशाची लूट सुरू आहे. त्याचाच परिणाम म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मुंबईची अवस्था बिकट झाली आहे, असा आरोप त्यांनी केला.

चेंबूरमधील दुर्घटनेचा उल्लेख करत पटोले म्हणाले की, पावसाळ्यापूर्वी झाडांच्या धोकादायक फांद्या छाटणे, रस्ते आणि नाले दुरुस्त करणे अशी आवश्यक कामे झाली नाहीत. काल एका निष्पाप विद्यार्थ्याचा जीव गेला. ही सरकारची जबाबदारी आहे. पण सरकार कोणतीही जबाबदारी स्वीकारायला तयार नाही, असे ते म्हणाले.

राजकीय घडामोडींवर भाष्य करत पटोले यांनी महायुतीवर विरोधी पक्षातील आमदार आणि खासदारांना आपल्या बाजूला ओढण्याचा आरोप केला. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे. तरीही जनतेचे प्रश्न सोडवण्याऐवजी इतर पक्षांचे आमदार-खासदार फोडण्याचे काम सुरू आहे. भ्रष्टाचारातून मिळालेल्या पैशांचे प्रलोभन दाखवून हे राजकारण सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला.

# ‘ऑपरेशन टायगरचाच भाग म्हणजे ऑपरेशन वरळी’:उदय सामंतांचा दावा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१मुंबई-** शिवसेनेचे नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर जोरदार टीका करत, सचिन अहिर यांच्या प्रवेशानंतर आता ऑपरेशन वरळी सुरू झाल्याचा दावा केला. शिवसेना (शिंदे गट) अधिक मजबूत होत असून, मुंबईसह राज्यभरातून नेत्यांचा पक्षप्रवेश सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सचिन अहिर यांच्या शिंदे गटातील प्रवेशानंतर पुढे आणखी नेते पक्षात येणार का, असा प्रश्न विचारला असता उदय सामंत म्हणाले की, पक्षप्रवेशाची प्रक्रिया रोज सुरू आहे.

कालही अनेकांनी पक्षात प्रवेश केला असून सचिन अहिर यांचा प्रवेश काही लोकांना मोठा धक्का देणारा ठरला आहे. सचिन अहिर



यांच्यासारखा मोठा नेता जर आमच्यासोबत येत असेल, तर महाराष्ट्रातील जनतेलाही काहीतरी घडत असल्याची जाणीव झाली आहे. हे वेगळं ऑपरेशन नाही. 'ऑपरेशन टायगर'चाच एक भाग म्हणजे 'ऑपरेशन वरळी' आहे, असा दावा त्यांनी केला.

वरळीचे आमदार सुनील शिंदे यांच्याबाबत सुरू असलेल्या चर्चांवर बोलताना सामंत म्हणाले की, सुनील शिंदे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, त्यांनी भविष्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची इच्छा व्यक्त केली, तर त्यांचे स्वागत करण्यात येईल. ते म्हणाले, सुनील शिंदे हे सक्षम नेतृत्व आहे.

ते धनुष्यबाण या चिन्हावर निवडून आले आहेत. त्यांना त्यांच्या मतदारसंघाचा विकास करण्यासाठी आमच्यासोबत यायचं असेल, तर आम्ही त्यांना का नाकारू?

सामंत म्हणाले की, काही जण चेहऱ्यावर दाखवत नसले तरी सचिन अहिर यांचा प्रवेश त्यांच्यासाठी मोठा धक्का आहे. सचिन अहिर यांच्यासारखा नेता जर बाजूला जाऊ शकतो, तर त्यामागे काहीतरी गंभीर कारण असणार, हे महाराष्ट्रातील जनतेलाही समजलं आहे, असे ते म्हणाले.

# विधान परिषदेत सचिन अहिर बिनविरोध उपसभापती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई-** विधान परिषदेत उपसभापतीपदाच्या निवडणुकीत मोठे नाट्य पाहायला मिळाले. शिंदेसेनेकडून उमेदवार असलेल्या सचिन अहिर यांची एकमताने उपसभापतीपदी निवड करण्यात आली. ऐनवेळी उद्धवसेनेच्या उमेदवाराने माघार घेतल्यामुळे सचिन अहिर यांचा उपसभापतीपदाचा मार्ग मोकळा झाला. या निवडणुकीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार विधान परिषदेत उपस्थित होते. ‘ऑपरेशन टायगर’ यशस्वी झाल्यानंतर उद्धवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला. उद्धवसेनेचे आमदार सचिन अहिर यांनी उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र करत शिंदेसेनेत प्रवेश केला. यानंतर लगेचच उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केला. तर, उद्धवसेनेकडून आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी अर्ज दाखल केला. सोमवारी झालेल्या विधानपरिषद उपसभापतीपदाच्या



निवडणुकीत उद्धवसेनेने ऐनवेळी माघार घेतली आणि सचिन अहिर यांची एकमताने निवड करण्यात आली.विधान परिषदेत उपसभापतीपदासाठीच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिंदेसेनेचे सचिन अहिर आणि महाविकास आघाडीकडून ठाकरे गटाचे जगन्नाथ अभ्यंकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मंत्री आणि भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांना दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर आवाजी मतदानाने सचिन अहिर यांची एकमताने विधान परिषदेच्या उपसभापती नियुक्ती झाली.

# महागाईचा सर्वात मोठा फटका आता शालेय खरेदीला


## पालकांकडून विशिष्ट दुकानाच्या सक्तीवरही नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

यंदा शैक्षणिक सत्रात बाजारपेठेत पाऊल ठेवताच पालकांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा वह्या, पुस्तके, गणवेश आणि इतर शैक्षणिक साहित्याचे दर प्रचंड वाढले आहेत. महागाईच्या या शैक्षणिक 'शॉक' मुळे सामान्य आणि मध्यमवर्गीय पालकांमध्ये प्रचंड तीव्र नाराजी पसरली आहे.

दरवाढीमागे कागदाच्या कच्च्या मालात आणि इंधन व वाहतूक खर्चात वाढ आणि जीएसटी व वाढलेली मजुरी ही मुख्य कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर पल्प आणि कागदाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमती वाढल्या आहेत. तसेच कापड आणि इतर साहित्यांवर लागणारा कर तसेच वाढलेली मजुरी यामुळे अंतिम उत्पादनांचे दर कडाडले आहेत. वह्या-पुस्तकेच नव्हे, तर दप्तर, वॉटर बॅग आणि गणवेशाच्या किमतीही गगनाला भिडल्या आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत ५०० ते ७०० रुपयांच्या तुलनेत स्कूल बॅगची किंमत ७०० ते १,२०० रुपये, ब्रँडेड स्टील व प्लास्टिक वॉटर बेंग २५० ते ४०० रुपयांवरून ३५० ते ६०० रुपये, २४० पानी मोठी वही (डझन) ४५० ते ५०० रुपयांवरून ५५० ते ६५० रुपये आहे.

शाळांनी यंदा फी वाढवली आहेच, त्यात आता एका मुलाच्या वह्या, पुस्तके आणि कपड्यांसाठी किमान ५ ते ७ हजार रुपये अतिरिक्त मोजावे लागत आहेत. घरात दोन मुले असतील, तर जून महिन्याचा पगार फक्त शाळेच्या साहित्यातच संपून जातो, अशी उद्विग्न प्रतिक्रिया पालकाची आहे. कागद महागल्यामुळे यंदा वेगवेगळ्या प्रकाशनांची गाईड्स,




वर्कबुक्स आणि प्रॅक्टिकल रजिस्टर्सच्या किमतीत थेट २० टक्क्यांची वाढ झाली आहे. सुबक कव्हर आणि मुलांच्या आवडत्या कार्टून थीम्स असलेल्या वह्यांच्या किमती तर सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. त्यातच अनेक खासगी शाळा विशिष्ट दुकानातूनच साहित्य घेण्याची सक्ती करत असल्यामुळे सवलती मिळणेही कठीण झाले आहे.

### युनिफॉर्म आणि शूजच्या दरातही वाढ

कापडाच्या किमती आणि शिलाई चार्जेस वाढल्यामुळे नामांकित शाळांच्या युनिफॉर्मचे दर १५ ते २० टक्क्यांनी वाढले आहेत. याशिवाय पीटीचे शूज, रोजचे बूट आणि पावसाळी सँडल्स यांच्या किमतीतही प्रतिजोडी मागे १०० ते १५० रुपयांची वाढ झाली.

संपादकीय ......

# आत्मचिंतनापेक्षा आगपाखड मोठी!

*शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला पुन्हा एकदा खिंडार पडल्यामुळे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसला आहे. ठाकरेंच्या पक्षातून नुकतेच सहा खासदार बाहेर पडले आणि त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. आता खासदार बाहेर पडल्यानंतर असाच प्रकार या पक्षाच्या आमदार आणि अगदी नगरसेवकांपर्यंतही पोहोचू शकतो की काय, अशी शक्यता दबक्या आवाजात व्यक्त होऊ लागली आहे. त्यामुळे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जे खासदार फुटले आहेत, त्यांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन तिथल्या कार्यकर्त्यांना बळ देण्याचा प्रयत्न केला. पक्षाला मोठी गळती लागलेली असल्यामुळे ती रोखण्यासाठी धडपड करणे हे पक्षप्रमुख या नात्याने त्यांचे कामच आहेत. यांनी सुरू केलेल्या या डॅमेज कंट्रोलसोबतच त्यांनी भाजपला डॅमेज करण्याचा डाव रचलेला दिसतोय. कारण तीन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाच विमानातून प्रवास करण्याचा योग आला. त्याविषयी आपल्या भाषणामधून उद्धव ठाकरे म्हणाले, या विमानभेटीत देवेंद्र फडणवीस हे आपल्याला हतबल झालेले दिसले. त्यांचे पंख कापण्याचे प्रयत्न केंद्रातून सुरू आहेत. त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा एकनाथ शिंदे यांना बळ देत आहेत. त्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांना कमजोर करण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या पक्षातून सहा खासदार फुटले ते भाजपमध्ये न जाता शिंदे यांच्या पक्षात गेले. एक गोष्ट खरी आहे की, खासदार शिंदे यांच्या पक्षात हे खासदार आल्यामुळे महाराष्ट्रात खासदारांच्या बाबतीत शिंदेचे बळ वाढले आहे. खासदार हे आमदारांवर प्रभाव टाकत असतात. आमदार पुढे नगरसेवक, पुढे सरपंच अशी ही निधी मिळण्याची उतरंड असते. त्यामुळे कुठल्याही पक्षाच्या दृष्टीने खासदारांची संख्या वाढणे महत्त्वाचे असते. त्यामुळे संसदेत पक्षाचे वजन आणि प्रभाव वाढतो. शिंदेंच्या पक्षात ठाकरे यांच्याकडील सहा खासदार आल्याने शिंदेंचा संसदेतील प्रभावही नक्कीच वाढला आहे. भाजपचे सध्या ९ खासदार आहेत, तर शिंदे यांच्या शिवसेनेचे आता १३ खासदार झाले आहेत.*

*उद्धव ठाकरे यांच्यासमोर पक्षाला लागलेली ही गळती थांबविण्याचे मोठे आव्हान आहे. त्यांचा पक्ष सोडणार्या या सहा खासदारांचे असे म्हणणे आहे की, आम्ही आमच्या मतदारसंघांच्या विकासासाठी शिंदेंच्या पक्षात प्रवेश केला आहे. दिवंगत अजित पवार यांनीसुद्धा काकांच्या मूळ पक्षात बंड करून भाजप आणि शिंदे यांच्या महायुतीशी हातमिळवणी केली तेव्हा लोकांच्या विकासासाठी मी हा निर्णय घेतला आहे, असे सांगितले होते. अर्थात, आजवर ज्यांनी मूळ पक्षातून बंड करून सत्ताधारी पक्षासोबत आले त्यांनी जनतेच्या विकासाचेच कारण दिले आहे. म्हणजे आम्ही जे काही बरेवाईट करतो ते जनतेच्या हितासाठीच असते, असे आपल्याकडील राजकीय नेत्यांचे म्हणणे असते. आज जे उद्धव ठाकरे सत्तेसाठी निष्ठाहीन झालेल्या आपल्या पक्षातील फुटिरांवर आगपाखड करत आहेत, ते २०१९ साली स्वत: घेतलेला निर्णय कसे काय विसरतात? खरे तर त्यांच्या पक्षाची आज जी अभूतपूर्व पडझड झालेली आहे, त्याला त्यांचा तोच निर्णय कारणीभूत होता याचे त्यांना सोयीस्कर विस्मरण होत आहे. त्यांना त्यावेळी मुख्यमंत्रीपद हवे होते, पण भाजप त्यांना द्यायला तयार नव्हता, कारण भाजपच्या आमदारांचे संख्याबळ जास्त होते. त्यामुळे त्यांनी आपण बाळासाहेबांना शिवसेनेचा मुख्यमंत्री बनवण्याचे वचन दिले होते हा मुद्दा काढला. खरे तर त्या अगोदर मनोहर जोशी आणि नारायण राणे शिवसेनेचे मुख्यमंत्री होऊन गेलेले होते. त्यामुळे शिवसेनेचा काही पहिल्यांदाच मुख्यमंत्री बनणार नव्हता. पण शेवटी कुठलाही राजकीय नेता असला तरी त्याच्यासाठी सत्ता महत्त्वाची असते. त्यात पुन्हा ठाकरेंना मुख्यमंत्रीपदाचे आकर्षण. त्यांची ही इच्छा भाजप पूर्ण करायला तयार नसल्यामुळे त्यांनी त्यांचे वैचारिक विरोधक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या महाविकास आघाडीशी हातमिळवणी केली आणि मुख्यमंत्रीपद मिळवले.*

*उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या हातातोंडाशी आलेली सत्ता घालवून त्यांना धडा शिकवला. मी परत येईन हा देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास मोडीत काढला. त्यातून त्यांना मानसिक समाधानही मिळाले, पण हे मुख्यमंत्रीपद मिळवताना त्यांनी राजकीय विश्वासार्हता गमावली. त्याचे परिणाम त्यांना आता भोगावे लागत आहेत. कारण शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी उभी हयात ज्या शरद पवार आणि काँग्रेसशी राजकीय आणि वैचारिक विरोधक म्हणून लढा दिला, त्याच पक्षांसोबत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी केलेली हातमिळवणी हा त्यांनी स्वत:च्या पक्षावर घातलेला मोठा घाव होता. कारण शिवसेना आणि भाजपची विचारसरणी ही मिळतीजुळती होती, तर शिवसेनेचे नव्याने मित्र झालेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीची विचारसरणी पूर्णपणे विरोधी होती. त्यामुळे खासदार, आमदार, कनिष्ठ पातळीवरील पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यामध्ये प्रचंड वैचारिक गोंधळ निर्माण झाला. या गोंधळानेच शिवसेनेचा पाया डळमळीत केला. जर आपले पक्षप्रमुख आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी आपली वैचारिक निष्ठा सोडत असतील, तर आम्ही तरी का म्हणून एकनिष्ठ रहायचे ही वृत्ती वाढू लागली. जर उद्धव ठाकरे यांनी ती चूक केली नसती तर फुटिरांना दोष देण्याचा नैतिक अधिकार त्यांना राहिला असता. आज ते फुटलेल्या खासदारांच्या नावाने आगपाखड करत आहेत. पण स्वत: त्यांनी २०१९ साली आपली सोयच पाहिली होती. तेव्हा आपल्या पक्षाच्या खासदार, आमदारांना काय वाटेल याचा विचार त्यांनी केला नव्हता. याविषयीचे आत्मचिंतन करायला उद्धव ठाकरे तयार आहेत का? की देवेंद्र फडणवीसांना खिजविण्यात ते धन्यता मानणार आहेत? कारण नुकसान फडणवीसांचे नाही ठाकरेंचे होत आहे.*

# अचलपूर तालुक्यात ४२ हजार हेक्टरवर पेरणीचे नियोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अचलपूर**

मॉन्सूनच्या समाधानकारक आगमनानंतर अचलपूर तालुक्यात खरीप पेरणीला वेग आला असून शेतकऱ्यांनी पर्यायी बियाणे व खतांचा स्वीकार करावा तसेच अधिकृत कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. यंदा अचलपूर तालुक्यात ४२ हजार ५६० हेक्टरवर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. मॉन्सून सक्रिय झाल्याने तालुक्यातील शेतकरी पेरणीच्या तयारीला लागले असून कृषी सेवा केंद्रांवर बियाणे व खत खरेदीसाठी गर्दी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार निविष्ठा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी कृषी विभागाने विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत. तालुका तक्रार निवारण समिती व तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली असून पेरणीच्या काळात प्रत्येक कृषी सेवा केंद्रावर कृषी साहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे. बनावट, बोगस किंवा निकृष्ट दर्जाच्या बियाणे, खते व कीटकनाशकांची विक्री करणाऱ्यांवर भरारी पथकांमार्फत कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही विभागाने दिला आहे. शेतकऱ्यांनी एकाच पिकाच्या वाणाचा किंवा एका खताच्या ग्रेडचा आग्रह न धरता पर्यायी बियाणे व खतांचा वापर करावा. बियाणे, खते व कीटकनाशके केवळ अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करून त्याची पक्की पावती घ्यावी. घरपोच किंवा अनधिकृत विक्रेत्यांकडून कमी दराच्या आमिषाला बळी पडून खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. बोगस निविष्ठांची विक्री अथवा संशयास्पद प्रकार आढळल्यास तालुका कृषी अधिकारी अक्षय क्षिरसागर किंवा पंचायत समितीचे कृषी अधिकारी रविकांत उईके यांच्याकडे लेखी तक्रार करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेत सभांचा दुष्काळ

## उपनगराध्यक्षांसह १७ नगरसेवकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अंजनगाव सुर्जी**

उनगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी गेल्या अनेक दिवसांपासून एकही सर्वसाधारण सभा आयोजित केली नसल्याचा आरोप करत उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांच्यासह १७ नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात धाव घेतली आहे.

नगरपरिषद औद्योगिक नगरी नियम १९६५ च्या कलम ८१ नुसार नियमितपणे सभा घेणे बंधनकारक असताना देखील नगराध्यक्ष व मुख्याधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करतअसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यामुळे शहरातील महत्त्वाचे विकासकामे, नागरिकांचे प्रश्न आणि धोरणात्मक निर्णय रखडले असल्याची खंत नगरसेवकांनी व्यक्त केली.उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांच्या नेतृत्वाखाली १७ नगरसेवकांनी सोमवारी जिल्हाधिकारी यांना लेखी विनंती अर्ज सादर केला. अर्जात म्हटले आहे की, नगरपरिषदेच्या नियमानुसार दर महिन्याला किमान एक सर्वसाधारण सभा होणे आवश्यक आहे. मात्रनगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सभा बोलावलेली नाही. सभेअभावी नाली बांधकाम, रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता मोहीम आणि इतर नागरी सुविधांसंबंधीचे प्रस्ताव मंजूर होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नगरपरिषद औद्योगिक नगरी नियम १९६५ च्या कलम ८१ नुसार नगरपरिषदेच्या कामकाजासाठी नियमित सभा घेणे अनिवार्य आहे. सभा न झाल्यास जिल्हाधिकारी यांना हस्तक्षेप करून सभाआयोजित करण्याचे अधिकार आहेत. याच आधारावर नगरसेवकाना जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने सभा लावण्याची मागणी केली आहे. 'नागरिकांनी आम्हाला निवडून दिले आहे. त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सभा होणेनगरपरिषद सत्ता स्थापन झाली तेव्हा पासून दोन सभा झाल्या आहेत तर तीसरी सभा विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू होती त्यामुळे ती सभा रद्द करण्यात आली होती. रद्द झालेली तीसरी सभा सात आठ दिवसांत होणार आहे. त्यामुळे शहरातील विविध प्रश्न या सभेच्या माध्यमातून सुटणार आहे.गरजेचे आहे. परंतु जाणीवपूर्वक सभा टाळून विकासकामांना खीळ घातली जात आहे,' असे उपनगराध्यक्ष प्रियंका मालठाणे यांनी सांगितले. सध्या जिल्हाधिकारी कार्यालयाने हे निवेदन स्वीकारले असून संबंधितांवर काय कारवाई होते.याकडे अंजनगाव सुर्जीतील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# प्लास्टिक बंदी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अमरावतीत व्यापारी, हॉटेल व रेस्टॉरंट व्यावसायिकांची जनजागृती कार्यशाळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती–** स्वच्छ, हरित, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक अमरावती शहर घडविण्याच्या उद्देशाने तसेच महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ आणि राज्य शासनाने प्लास्टिक व थर्माकोलच्या अविघटनशील वस्तूंवरील वापरबंदीबाबत जारी केलेल्या अधिसूचनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी अमरावती महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात शहरातील व्यापारी, हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालय, कॅटरिंग व्यावसायिक आणि विविध व्यावसायिक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी जनजागृती व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्लास्टिक बंदीच्या नियमांचे काटेकोर पालन, पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी आणि शाश्वत विकासाचा संदेश देणारी ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.कार्यशाळेस महापौर श्रीचंद तेजवानी, मनपा आयुक्त वर्षा लड्डा, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी संजय दे. पाटील, उपप्रादेशिक अधिकारी डॉ. योगिनी बाळंखे, क्षेत्र अधिकारी डॉ. प्रियश्री देशमुख, जितेंद्र पुरते आणि विशाल जाधव यांनी उपस्थित राहून प्लास्टिक बंदी कायद्याच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेच्या प्रस्तावनेत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले की, प्लास्टिक प्रदूषण ही वाढती पर्यावरणीय समस्या असून त्यावर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी जनजागृती आणि कायद्याची काटेकोर अंमलबजावणी या दोन्ही बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्लास्टिक बंदी संदर्भातील शासनाच्या नियमांची व्यापारी, हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालय, कॅटरिंग व्यावसायिक तसेच सर्व संबंधित घटकांना सविस्तर माहिती मिळावी आणि नियमांविषयी कोणताही संभ्रम राहू नये, या उद्देशाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सहकार्याने या मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून, व्यापारी व व्यावसायिकांनी शासनाच्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करून अमरावती शहर प्लास्टिक मुक्त करण्याच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच अमरावती महानगरपालिका जनजागृती, तपासणी आणि कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालय, कॅटरिंग व्यावसायिक, व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, दुकानदार, विविध व्यावसायिक संस्थांचे प्रतिनिधी, अमरावती महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके यांच्यासह सर्व जेष्ठ स्वास्थ निरीक्षक व स्वास्थ निरीक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवर प्रश्न विचारून अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शनही घेतले.यावेळी अधिकाऱ्यांनी एकेरी वापरातील (सिंगल यूज) प्लास्टिक वस्तूंवरील बंदी, प्लास्टिक कॅरीबॅगसाठी लागू असलेले मायक्रॉन निकष, पुनर्वापरयोग्य प्लास्टिकच्या वापराबाबतचे नियम, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य विलगीकरण, संकलन, वाहतूक, पुनर्प्रक्रिया (रिसायकलिंग) तसेच अधिकृत पुनर्प्रक्रिया केंद्रांकडे प्लास्टिक कचरा सुपूर्द करण्याची कार्यपद्धती याबाबतही सविस्तर माहिती दिली. प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास पर्यावरणीय हानी मोठ्या प्रमाणात कमी करता येते, असे त्यांनी स्पष्ट केले.अमरावती महानगरपालिका प्लास्टिकमुक्त शहराच्या उद्दिष्टासाठी सातत्याने जनजागृती, तपासणी आणि अंमलबजावणीची मोहीम राबविणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणाचे सामाजिक उत्तरदायित्व ओळखून स्वच्छ, हरित आणि शाश्वत अमरावतीच्या निर्मितीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

## आरोग्य उपसंचालक

# डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांची भातकुली ग्रामीण रुग्णालयाला भेट

## डायलिसिस व BPHU सेवा तातडीने सक्षम करण्याचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१भातकुली** आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांनी भातकुली येथील ग्रामीण रुग्णालयाला अचानक भेट देत विविध विभागांची सखोल पाहणी केली. या भेटीदरम्यान रुग्णालयातील आरोग्य सेवा, सुविधा आणि रुग्णांना दिल्या जाणाऱ्या उपचारांचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. अचानक झालेल्या या पाहणीमुळे रुग्णालय प्रशासनात चांगलीच धावपळ उडाली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. चेतन मुनूत उपस्थित होते.पाहणीदरम्यान डॉ. वाकचौरे यांनी डायलिसिस विभागाला विशेष भेट देत तालुक्यातील मूत्रपिंडाच्या रुग्णांना उपचारासाठी अमरावतीला जावे लागू नये, यासाठी भातकुलीतच दर्जेदार आणि नियमित डायलिसिस सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ अधिकाधिक गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला केल्या.याशिवाय ब्लॉक पब्लिक हेल्थ युनिट (इझक्रा) चीही त्यांनी पाहणी केली. सध्या काही विभाग भातकुलीत सुरू असले तरी उर्वरित विभाग अमरावती येथे कार्यरत असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली. याची गंभीर दखल घेत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून सर्व विभाग तातडीने भातकुलीत स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले. साथीचे आजार, सार्वजनिक आरोग्य आणि प्रयोगशाळा चाचण्यांशी संबंधित सर्व सेवा तालुक्यातच उपलब्ध व्हाव्यात, यावर त्यांनी भर दिला.तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती सातफडे यांनी येत्या एक ते दीड महिन्यात इझक्रा चे सर्व विभाग भातकुलीत कार्यान्वित करण्यात येतील, अशी माहिती दिली. तर वैद्यकीय अधीक्षक डॉ. चेतन मुनूत यांनी भातकुली ग्रामीण रुग्णालयातील डायलिसिस सेवा पूर्ण क्षमतेने सुरू असून तालुक्यातील रुग्णांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. उपसंचालकांच्या या पाहणीमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# वडाळीच्या बागेत बाळासाहेबांचे स्मारक उभारा

## शिवसेना पदाधिकाऱ्यांची मनपा आयुक्तासोबत चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१अमरावती**

महापालिकेच्या वडाळी येथील बागेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे याचे स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. पक्षाच्या शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांची भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, पर्यटन व सौंदर्यकरणाची कामे महापालिकेने करावीत यासाठी ४ वर्षापूर्वी ठराव मंजूर करण्यात आला होता. परंतु अद्याप कामाची सुरवात झालेली नाही. अनेकदा निवेदन देऊनही ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नाही. त्यामुळे सोमवारी (ता. २९) शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांच्या दालनात बैठक घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले. तातडीने स्मारकाचे काम सुरू करावे, अन्यथा येत्या काळात आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा शिवसेनेच्या वतीने यावेळी देण्यात आला. यावेळी शिवसेनेचे गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, स्वीकृत नगरसेवक दिनेश बूब, जिल्हाप्रमुख संतोष बद्रे, शहरप्रमुख अजय महाले, नीतेश शर्मा उपशहर प्रमुख, अजमत शहा, आशिष लुल्ला, समीर कोरपे, विकेश गवाळे, अमर करीशिया, शुभम साबळे, राजेश पाठक, सूरज बरडे, शुभम दमाये, सचिन पाटील, शेख सिकंदर, सारंग भोयर शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.नुकतीच सुरू झाली सुधारणा बऱ्याच वर्षांपासून कंत्राट संपुष्टात आल्यापासून शहरातील पर्यटनाचे मुख्य केंद्र असलेला मनपाचा बगीचा तसाच पडून होता. जनप्रतिनिधींनी पुढाकार केले आहे.

# पात्र लाभार्थ्यांना न्याय कधी ? पुरवठा विभागाकडून प्रभावी अंमलबजावणी कराग्रामस्थांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अंजनगाव सुर्जी**

२७तालुक्यातील सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशन व्यवस्था) अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरिकाभिमुख करण्याची मागणी विविध भागातील नागरिकांकडून होत आहे. शासनाच्या अन्न सुरक्षा योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत वेळेवर आणि नियमानुसार पोहोचावा, तसेच पुरवठा विभागाने आपल्या वैधानिक जबाबदाऱ्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रेशन दुकानांची नियमित तपासणी, धान्याच्या साठ्याची पडताळणी, वितरण प्रक्रियेवर प्रभावी देखरेख आणि शासनाने निश्चित केलेल्या निकषांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांना निर्धारित प्रमाणात व गुणवत्तेचे धान्य वेळेत मिळत आहे की नाही, याची नियमित पडताळणी प्रशासनाने करावी, अशी मागणी होत आहे. शिधापत्रिकांशी संबंधित नवीन अर्ज, नाव समाविष्ट करणे, नाव कमी करणे, पत्ता बदल, दुरुस्ती, ई–केवायसी आणि इतर प्रकरणांचा अनावश्यक विलंब न करता वेळेत निपटारा व्हावा, अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांना आवश्यक कागदपत्रे, प्रक्रिया आणि निर्णयांची माहिती स्पष्टपणे उपलब्ध करून देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात येत आहे. काही नागरिकांनी रेशन व्यवस्थेशी संबंधित तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी व्हावी आणि प्रत्येक तक्रारीवर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ज्येष्ठ नागरिक,




दिव्यांग, विधवा महिला आणि दुर्गम भागातील लाभार्थ्यांना रेशन मिळविताना अडचणी येऊ नयेत यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. शासनाच्या योजनांबाबत जनजागृती करण्यात यावी आणि पात्र नागरिक कोणताही लाभ बंचित राहणार नाही, यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. याशिवाय, पुरवठा विभागाने वेळोवेळी रेशनदुकानांची आकस्मिक तपासणी करावी, नियमांचे पालन होत असल्याची खात्री करावी आणि आढळणाऱ्या त्रुटींबाबत प्रचलित कायदे व नियमांनुसार योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिक व प्रशासन यांच्यात समन्वय वाढावा यासाठी नियमित लोकसुनावणी किंवा तक्रार निवारण बैठकांचे आयोजन करावे, असेही मत व्यक्त करण्यात आले आहे. शासनाच्या अन्न सुरक्षा योजनांचा उद्देश सर्वसामान्य नागरिकांना अन्नधान्याची हमी देणे हा आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण प्रणालीवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी पुरवठा विभागाने पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि तत्पर सेवा या तत्त्वांनुसार काम करावे. नागरिकांच्या मागण्यांची दखल घेऊन आवश्यक सुधारणा आणि प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# बारमाही पाण्याने फुलला मेळघाट

## ११८ बंधाऱ्यांचा सकारात्मक परिणाम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ चिखलदरा–** चिखलदरा तालुक्यात पावसाचे पाणी डोंगर उतारावरून वाहून जात असल्याने तहानलेली राहणारी चिखलदरा तालुक्यातील शेती आज ग्याबियन बंधारे आणि सिमेंट नाला बांधांमुळे हिरवीगार होत आहे. सन २०२४ ते २०२६ या दोन वर्षात जिल्हा परिषद लघु जलसिंचन विभागाने उभारलेल्या ११८ बंधाऱ्यांनी मेळघाटातील शेकडो शेतकऱ्यांच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण केला आहे. या बंधाऱ्यांमुळे सुमारे २०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असून गहू, हरभरा आणि इतर रब्बी पिकांच्या उत्पादनात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. यासोबतच स्थानिक मजुरांना वर्षभर रोजगार उपलब्ध झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लागला आहे. भांडोरा, कालापांढरी, कारदा, बामादही, पाचडोंगरी, आवागड आणि राजनिकुंड या गावांमध्ये जिथे पूर्वी सिंचनाची कोणतीही व्यवस्था नव्हती, तिथे आज शेतात पाणी पोहोचत आहे. अनेक वर्षांची शेतकऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे.राजनिकुंड येथील शेतकरी किरण पोकडे म्हणाले, माझ्या शेतात ग्याबियन बंधारा झाल्यामुळे दोन एकर क्षेत्राला सिंचनाची सुविधा मिळाली. आज मी गहू आणि हरभऱ्याचे भरघोस उत्पादन घेत आहे. हा बंधारा आमच्यासाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरला आहे.

> सिमेंट नाला बांधामुळे पाणी अडले, जमिनीत मुरले आणि शेतीला जीवदान मिळाले. याचा फायदा फक्त शेतकऱ्यांनाच नाही, तर जंगलातील वन्यप्राणी आणि गावातील पाळीव जनावरांनाही होत आहे.
> **– अशोक अलोकार उपसरपंच, राजनिकुंड.**

# ५० क्लासेसकडे नो परमीशन, २९ ला फायर ऑडीट नोटीस

## राजकीय हस्तक्षेपामुळे कारवाई पुन्हा थंड बस्त्यात जाणार?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती**
लखनऊमध्ये नुकत्याच झालेल्या अग्नितांडवामुळे शहरातील कोचिंग क्लासेस आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अशातच शहरातील कोचिंग क्लासेसचा आढावा घेतला असता मनपा हद्दीतील तब्बल ५० कोचिंग क्लासेसकडे बाजार परवाना विभागाचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्रच नसल्याचे धक्कादायक व तेवढेच चिंतादायक वास्तव समोर आले आहे. दरम्यान, दुसरीकडे मनपाच्या अग्निशामक विभागाने २९ कोचिंग क्लासेसला फायर ऑडिट करण्यासाठी नोटिसा बजावल्या आहेत. विशेष म्हणजे शहरातील काही मुख्य मार्केट आणि मॉलमध्ये सुद्धा कोचिंग क्लासेस सुरु आहे. मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर क्लासेस चालकांचे धाबे दणाणले असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे.शहरातील कमर्शियल मार्केट आणि संस्थांच्या इमारतींमध्ये चालणाऱ्या क्लासेससाठी फायर ऑडिटचे वेगवेगळे नियम आहेत. कमर्शियल मार्केटमध्ये नियमानुसार १८१.५० रुपये प्रति चौरस मीटर प्रमाणे क्षेत्रफळावर फायर ऑडिटचे शुल्क वसूल केले जाते. जर संस्थांमार्फत चालणाऱ्या मार्केटमध्ये क्लास असेल, तर १२१ रुपये प्रति चौरस मीटर शुल्क आकारले जाते. तसेच, दरवर्षी हे फायर ऑडिट रिन्यू (नूतनीकरण) करण्यासाठी १० रुपये प्रति चौरस मीटर शुल्क आकारण्याची तरतूद आहे. शहरातील केवळ ३ ते ४ मोठ्या कमर्शियल बिल्डिंगमधील कोचिंग क्लासेसचे फायर ऑडिट झाले आहे, मात्र त्यातील काही कोचिंग क्लासेसला नूतनीकरणासाठी नोटिस पाठविण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, बाजार परवाना मिळवण्यासाठी आधी बांधकाम परवानगी आणि फायर ऑडिट असणे आवश्यक आहे. त्यानंतर मनपातर्फे वार्षिक ५,००० रुपये शुल्क आकारून बाजार परवाना दिला जातो. परंतु, ५० क्लासेसनी या नियमांना केराची टोपली दाखवली आहे.नेहमीप्रमाणे शैक्षणिक सत्र सुरू झाले की मनपा बैठक घेते आणि नोटिसा जाहीर करते, असा इतिहास आहे. यापूर्वी माजी मनपा आयुक्त संजय निपाणे यांनीही कोचिंग क्लासेसवर कडक कारवाईचे निर्देश दिले होते. त्यावेळी काही क्लासेस चालक परवाने काढण्यासाठी पुढे आले होते, परंतु नंतर राजकीय हस्तक्षेपामुळे हे संपूर्ण प्रकरण थंड बस्त्यात पडले. आता पुन्हा आयुक्त वर्षा लड्डा यांनी विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळू देणार नाहीर अशी ठाम भूमिका घेतल्याने कोचिग क्लासेसच्या चालक मंडळाने तात्काळ महापौर श्रीचंद तेजवानी यांची भेट घेऊन त्यांना सहकार्यासाठी निवेदन सादर केले आहे. त्यामुळे आयुक्तांच्या कारवाईला पुन्हा राजकीय रंग लागणार का? की यंदा विनापरवाना क्लासेसवर हातोडा पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.पालकांकडून लाखो रुपयांची फी वसूल करणारे कोचिंग क्लासेस चालक विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मात्र कोणतीही ठोस उपाययोजना करत नसल्याचे चित्र आहे. ६ वर्षांपूर्वी सुरत आणि आता लखनऊ येथे घडलेल्या भीषण अग्निकांडासारखी घटना जर अमरावतीत घडली, तर याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. घटना घडल्यास नेहमी मनपा प्रशासनाला जबाबदार धरले जाते, पण कारवाई करताना अडथळा आणणारे राजकीय नेते याची जबाबदारी घेणार का, असाही प्रश्न नागरिक विचारत आहेत.



# मनरेगाला निरोप; आजपासून 'व्हीबी जी रामजी'ची अंमलबजावणी, जिल्ह्यात ३८ हजारांहून अधिक कामे अपूर्णच

## १२५ दिवस रोजगाराची कायदेशीर हमी, मात्र पेरणी–कापणीच्या काळात ६० दिवस सार्वजनिक कामांना विराम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१अमरावती** केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ऐवजी 'विकसित भारत–गॅरंटी फॉर रोजगार अँण्ड आजीविका मिशन' (व्हीबी जी रामजी) कायदा २०२५ लागू केला असून, आज बुधवार (१ जुलै)पासून या नव्या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. मात्र, अमरावती जिल्ह्यात सध्या ३८ हजार ६९८ कामे अपूर्ण असल्याने या कामांचे भवितव्य आणि निधीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.जिल्ह्यातील प्रलंबित कामांमध्ये सुमारे ८० टक्के कामे घरकुलाशी संबंधित आहेत. याशिवाय अनेक कामे २०२६–१७ पासून प्रलंबित असून, गेल्या चार–पाच वर्षांतील कामांची संख्याही मोठी आहे. नव्या योजनेच्या अंमलबजावणीपूर्वी लाभार्थ्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. तरीही मोठ्या प्रमाणावर कामे अपूर्णच राहिली आहेत.नव्या 'व्हीबी जी रामजी' योजनेत प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील इच्छुक प्रौढ सदस्याला एका आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या अकुशल मजुरीच्या रोजगाराची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. यापूर्वी मनरेगाअंतर्गत १०० दिवस रोजगाराची तरतूद होती. त्यामुळे रोजगाराच्या संधी वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या योजनेत ३१८ प्रकारच्या विकासकामांना मंजुरी देण्यात येणार असून त्यांची विभागणी चार प्रमुख गटांत करण्यात आली आहे. यामध्ये तलावांचे पुनरुज्जीवन, कालवे, बंधारे, विहिरी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ग्रामपंचायत भवन, अंगणवाडी केंद्रे, ग्रामीण ग्रंथालये, रस्ते, बचतगटांसाठी इमारती, अन्नधान्य गोदामे, पशुधन शेड, मत्स्यपालन सुविधा, पूर नियंत्रण तटबंदी, चक्रीवादळ निवारे आणि वनीकरण अशा विविध विकासकामांचा समावेश आहे.मात्र, या योजनेतील महत्त्वाची अट म्हणजे पेरणी आणि कापणीच्या हंगामात सार्वजनिक कामांना तब्बल ६० दिवसांचा सक्तीचा विराम राहणार आहे. त्यामुळे शेती हंगामात मजुरांना शेतमजुरीकडे वळण्यास प्रोत्साहन मिळणार असले तरी विकासकामांच्या गतीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.योजनेनुसार मजुरांचे वेतन साप्ताहिक किंवा पंधरवड्याच्या आत थेट बँक खात्यात जमा केले जाणार आहे. तसेच कामाची मागणी करूनही नियोजित मुदतीत रोजगार उपलब्ध न झाल्यास संबंधित लाभार्थ्यांना बेरोजगारी भत्ता देण्याचीही कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे.दरम्यान, नव्या योजनेत ३१८ प्रकारची कामे घेण्याची मुभा असल्याने ग्रामीण भागातील शाश्वत पायाभूत सुविधा निर्मितीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास उपजिल्हाधिकारी (रोहयो) ज्ञानेश घ्यार यांनी व्यक्त केला आहे.



# ढगफुटीसदृश पाऊस; १ मृत, १ बेपत्ता!

## शिरजगावात ८३ मिमी पावसाची नोंद, चारगड नाल्याला पूर आल्याने घडली घटना


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१ शिरजगाव कसबा**
चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा लगतच्या पांढरी गावातील दोन शेतकरी चारगड नाल्यावरील पुलावरून जात असताना पुराच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेल्याची हृदयद्रावक घटना रात्री दहा वाजताच्या सुमारास घडली. या घटनेतील एका शेतकऱ्याचा मृतदेह सकाळी सापडला असून,दुसऱ्या शेतकऱ्याचा शोध सुरू आहे. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वत राजीत झालेल्या मुसळधार पावसामुळे मेघा नदीसह परिसरातील नदी,नाले दुथडी भरून वाहत असल्याने ही घटना घडली आहे.रवींद्र रामभाऊ आवारे (वय ५५) असे मृतशेतकऱ्याचे, तर गोपाल निर्वार असे बेपत्ता असलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. हे दोघेही पांढरी गावातीलरहीवासी आहेत. गोपाल निर्वार आणि रवींद्र आवारे हे सायंकाळी काही कामानिमीत्त गावातूनशिरजगाव कसबा येथे आले होते. दरम्यान रात्री सुमारेदहा वाजताच्या सुमारास शिरसगाव कसबा येथून पायीमूळ गावी पांढरीकडे निघाले होते. शिरजगाव ते पांढरी मार्गावरील चारगड नाल्याला मुसळधार पावसामुळेमोठा पूर आला होता. पुराच्या पाण्याचा अंदाज नआल्याने पुल ओलांडताना दोघेही वेगवान प्रवाहातवाहून गेले. घटनास्थळा पासूनसुमारे दोन किलोमीटर अंतरावर सुधाकर सावरकर यांच्या शेताजवळ नाल्यातील काटेरी झुडपात रवींद्रआवारे यांचा मृतदेह अडकलेल्या अवस्थेत आढळून आला. मात्र गोपालनिर्वार यांचा सोमवारी सायंकाळपर्यंत शोध लागला नसून डीडीआरएफ पथक आणि स्थानिक नागरिकांकडून शोधकार्य सुरू होते. रात्री दोन ते तीन तास झालेल्या मुसळधार पावसामुळे करजगाव व शिरजगाव महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या दोन्ही महसूल मंडळात प्रत्येकी ८३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.



# पूर्णा नदीत हजारो मशांचा मृत्यू

## विष टाकल्याचा संशय : काठावर साचला खच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१खोलापूर**
भातकुली तालुक्यातील खोलापूर येतील पूर्णा नदीत अज्ञात व्यक्तीने विषारी औषध टाकल्याने नदीतील सर्व मासे मरण पावले आहेत. नदीच्या काठावर मास्यांचा खच निर्माण झाला असून हे कृत्य कुणी केले याचीच चर्चा गावात आहे. खोलापूर कजबा येतील काही युवक आपली जनावरे नदीकाठी चारत होते. जनवारांना पाणी पिण्यासाठी त्यांनी नदीवर नेले असता त्यांना नदीत मरण पावलेल्या माश्यांचा खच दिसला. त्यामुळे त्यांनी आपले जनावरे घरी आणून पाणी पाजले व परिसरातील नागरिकांना त्याबद्दल माहिती दिली. नदीत कोणीही जनावरे पाणी पिण्यास घेऊन जाऊ नका, असा सल्ला त्यांनी गावातील नागरिकांना दिला. नदीत कोणी काय व कशासाठी टाकले याची चौकशी करण्याची मागणी खोलापूर कजबा येथील नागरिकांनी केली आहे. अज्ञात व्यक्तीने नदीच्या पाण्यात विषारी औषध टाकल्याने हजारो मासे मरण पावले असून काही जनावरांनी जर हे पाणी पिले तर त्यांना सुद्धा धोका होऊ शकता. या नदीवर पशु, पक्षी, गुरे ढोरे पाणी पिण्यासाठी येतात. तसेच नागरिक सुद्धा वापरण्याकरिता नदीचे पाणी घरी आणतात व जनवारांना सुद्धा पिण्यासाठी पाणी वापरतात. याबद्दल चौकशी करून हे कृत्य करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त मोझरी येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१गुरुकुंज मो.**
हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आणि महाराष्ट्र कृषी दिन तसेच राष्ट्रीय सेवा योजना (छडड) अंतर्गत श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती येथील ग्रामीण कृषी कार्य अनुभव (ठ–थए) करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने मोझरी ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात प्रथमेश गिऱ्हे, साहिल कोसरे, संकेत लहाने, साईप्रसाद जाधव, श्रेयश नेमाने आणि आदित्य महल्ले या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.वृक्षारोपणाचा शुभारंभ मोझरी ग्रामपंचायतीचे प्रशासक सुरेंद्र भिवगडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रशांत प्रधान (प्रशासक समिती सदस्य), पुंडलिक लेकुरवाडे (ग्राम रोजगार सेवक), प्रवीण खेरडे (लिपिक), सुमित वानखडे (कर्मचारी) तसेच ग्रामपंचायतीचे कर्मचारी, गावातील नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



# जल है तो कल है – विष्णोराच्या अनिल ठाकरेंचे शेततळे ठरले 'आदर्श मॉडेल'!

## 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा १००% यशस्वी प्रयोग; पहिल्याच पावसात तुडुंब भरले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१विष्णोरा –**शासनाच्या पाणी आडवा, पाणी जिरवा या मोहिमेला विष्णोरा येथील शेतकरी अनिल ठाकरे यांनी मूर्त स्वरूप दिले आहे. 'मागेल त्याला शेततळे' योजनेअंतर्गत त्यांनी आपल्या शेतात सात आठ वर्षांपूर्वी खोदलेले शेततळे यावर्षी सुद्धा पहिल्याच मान्सूनमध्ये १००% पाण्याने भरले असून परिसरातील भूजल पातळी वाढवण्यात त्याचा मोठा हातभार लागला आहे.

अनिल ठाकरे यांच्या शेतातील घराशेजारी असलेले हे शेततळे सध्या पाण्याने तुडुंब भरले आहे. सुमारे ५०३० मीटर आकाराचे व ३ मीटर खोलीचे हे तळे शासकीय अनुदानातून साकारले आहे. पत्रकाराशी बोलताना अनिल ठाकरे म्हणाले कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली मी योग्य जागा निवडून बोरवेल पासून दहा ते बारा फुटाच्या अंतरावर योग्य खोलीचे तळे खोदले. याचा मला सात ते आठ वर्षापासून दरवर्षी फायदा होत आला या वर्षी सुद्धा पहिल्याच जोरदार पावसात ते काठोकाठ भरले. याचा फायदा फक्त मला नाही, तर माझ्या शेजारच्या २ बोअरवेल व १ विहिरीला झाला. पाणीपातळी बऱ्यापैकी वाढली आहे. आता मी रब्बी हंगामात हरभरा व गहू बिनधास्त घेऊ शकतो. त्याचबरोबर जनावरांच्या पिण्याचा प्रश्नही मिटला.पाणी आडवा, पाणी जिरवा चे जिवंत उदाहरणशेततळ्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत जिरून भूजल साठा वाढतो, हे या तळ्याने सिद्ध केले आहे. पारंपरिकरित्या जिरायत शेती करणाऱ्या शेतकऱ्यासाठी हे शेततळे वरदान ठरत आहे. उन्हाळ्यात टँकरवर अवलंबून राहणाऱ्या गावाला असे १० तळी झाली तर कायमस्वरूपी दुष्काळमुक्ती मिळू शकते.



> **अनिल ठाकरे यांचा संदेश – जल है तो कल है**
> शासन योजना देते, पण आपण ती प्रामाणिकपणे राबवली पाहिजे. मी सर्व शेतकरी बांधवांना विनंती करतो की प्रत्येकाने आपल्या शेतात पाणी अडवा. एक शेततळे १० कुटुंबांना जगवू शकते. आज पाणी साठवलं तरच उद्याचं भविष्य सुरक्षित आहे. 'जल है तो कल है' हे मी अनुभवलं आहे, असे आवाहन अनिल ठाकरे यांनी केले.

# अप्पर वर्धा प्रकल्पातील गाळ कधी काढणार?

## जलसाठा क्षमता घटण्याची भीती ; शेतकऱ्यांची तातडीने गाळ उपसण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१मोर्शी–** अप्पर वर्धा धरणात साचलेला गाळ तातडीने काढण्यात यावा, अशी मागणी शेतकऱ्यांची आहे. गेल्या अनेक वर्षांपासून धरणातील गाळ उपसण्यात आलेला नसल्याने जलसाठा क्षमतेवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. अप्पर वर्धा धरणाची पूर्ण जलसाठा पातळी (एफआरएल) ३४२.५० मीटर असून, एकूण जलसाठा क्षमता ३६०.७६ दशलक्ष घनमीटर आहे. मात्र, गेल्या ३५ ते ४० वर्षांत मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने धरणातील उपयुक्त जलसाठा कमी होत असल्याचे वास्तव आहे. शेतकऱ्यांच्या मते, धरणातील गाळ उपसल्यास जलसाठा क्षमता वाढण्यास मदत होईल. भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्याबरोबरच धरणातील सुपीक गाळ शेतीसाठी उपलब्ध करून दिल्यास जमिनीची उत्पादकता वाढण्यासही हातभार लागेल. अप्पर वर्धा प्रकल्पामुळे मोर्शी, नेरपिंगळाईसह अमरावती जिल्ह्यातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. तसेच उजवा व डावा कालवा मिळून सुमारे ९५ किलोमीटर परिसरातील ८५ हजार हेक्टरहून अधिक शेतीला सिंचनाचा लाभ मिळतो. धरणाला १३ दरवाजे असून, हा प्रकल्प जिल्ह्याच्या कृषी आणि पाणीपुरवठा व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार मानला जातो. धरणातील वाढत्या गाळाचे सर्वेक्षण करून गाळ उपसण्याची प्रक्रिया शासनाने तातडीने हाती घ्यावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांनी केली आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या जीवनवाहिनी ठरलेल्या अप्पर वर्धा प्रकल्पातील गाळ काढण्याचा निर्णय शासन कधी घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



> अप्पर वर्धा प्रकल्पामध्ये गाळ भरपूर साचला असेल. धरणाच्या शेवटच्या टोकाला जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. लघुप्रकल्पाला गाळमुक्त योजना आहे, परंतु आपला प्रकल्प मोठा असल्यामुळे गाळ काढण्याची शासनाची योजना नाही. शेतकऱ्यांना गाळ लागल्यास विना रॉयल्टी आपण गाळ देऊ, तशी शेतकऱ्यांनी मागणी करावी तसेच वाळूचा सुद्धा भरपूर प्रमाणात साठा असेल, त्याचेसुद्धा नियोजन करण्यात येईल.
> **श्रीकांत उमप, कार्यकारी अभियंता.**

## शिक्षकांना मोठा दिलासा;

# ‘माहितीचा वार शनिवार’ उपक्रम लागू

### दररोज केवळ तीन अत्यावश्यक नोंदी, उर्वरित माहिती आठवड्यातून एकदाच

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ अमरावती**

राज्यातील शिक्षकांना विविध प्रकारचे अहवाल,



आकडेवारी आणि प्रशासकीय माहिती सादर करण्याच्या दैनंदिन ताणातून मोठा दिलासा देणारा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ’माहितीचा वार शनिवार’ या नव्या उपक्रमाअंतर्गत मुख्याध्यापक आणि शिक्षकांना आता दररोज केवळ तीन अत्यावश्यक नोंदी कराव्या लागतील. उर्वरित सर्व माहिती आठवड्यातून एकदाच, शनिवारी सादर करावी लागणार आहे.यापुढे शाळांतील विद्यार्थी उपस्थिती, शिक्षकांची उपस्थिती आणि मध्यान्ह भोजनासंदर्भातील आवश्यक माहिती एवढीच माहिती दररोज सादर करावी लागेल. इतर सर्व अहवाल, विद्यार्थी आकडेवारी, योजनांची माहिती, सर्वेक्षणे आणि प्रशासकीय माहिती शनिवारी एकत्रितपणे पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शिक्षकांकडून वारंवार मागविण्यात येणाऱ्या विविध ऑनलाइन अहवालांमुळे अध्यापनाच्या वेळेवर परिणाम होत असल्याची तक्रार सातत्याने केली जात होती. शासनाच्या या निर्णयामुळे अनावश्यक माहिती मागविण्यावर नियंत्रण येणार असून, शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी अधिक वेळ देता येणार आहे.या निर्णयाचा लाभ अमरावती जिल्ह्यासह राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील हजारो शिक्षकांना होणार असून, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणालाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

#### शिक्षकांवर इतक्या अशैक्षणिक कामांचा बोजा

विविध योजनांचे ऑनलाइन अहवाल, विद्यार्थी व शाळांची आकडेवारी, सर्वेक्षण व पडताळणी, शासकीय पत्रव्यवहार व माहिती संकलन, विविध विभागांकडून वारंवार मागविली जाणारी माहिती, पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्याची जबाबदारी शिक्षकांना पार पाडावी लागते. नव्या निर्णयामुळे शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.

## पडीक जमिनीवर रोजगार फुलणार;

# महिला बचतगटांना एक रुपयात भाडेपट्ट्याने जमीन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती**

ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना आणि शासकीय पडीक जमिनींवरील अतिक्रमणांना आळा घालण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने ’राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना’ जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून ही योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेअंतर्गत राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट तसेच ’उमेद-माविम’ अंतर्गत ग्रामसंघांना केवळ एक रुपया



वार्षिक भाडेपट्ट्याने उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या जमिनींचा वापर पशुपालन, शेतीपूरक उद्योग आणि रोजगारनिर्मितीसाठी करता येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील तहसीलदारांना गावनिहाय शासकीय जमिनींचा आढावा घेऊन अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उपलब्ध जमिनींची माहिती गाव नमुना क्रमांक १ ’क’मध्ये नोंदवून जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती, तर तालुकास्तरावर स्वतंत्र समिती कार्यरत राहणार असून पात्र महिला बचत गटांच्या अर्जांवर निर्णय घेण्याची जबाबदारी या समित्यांवर असेल.

#### बांबू, चारा लागवडीतून मिळणार उत्पन्न

राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत महिला बचत गट आणि संस्थांना शासकीय पडीक जमिनी केवळ १ रुपयात भाडेपट्ट्याने दिल्या जातात. या जमिनींवर बांबू, चारा आणि अपारंपरिक ऊर्जा पिकांची लागवड करून महिलांना दरवर्षी ४ ते ५ लाखांपर्यंत उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

#### पात्रता व निकष काय? कुठे करायचा संपर्क?

आपल्या कार्यक्षेत्रातील तहसील कार्यालयात संपर्क साधून अर्ज सादर करावा. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात किंवा संबंधित जिल्ह्याच्या महसूल विभागाकडे संपर्क करू शकता. महाराष्ट्र महिला आर्थिक विकास महामंडळ किंवा उमेद अभियानाच्या तालुका-जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा.

#### कोणत्या गटाला किती जमीन मिळणार?

या योजनेसाठी महिला बचत गट किंवा ग्रामसंघ हा ’उमेद’ अभियानांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. बचत गटाची नोंदणी किमान तीन वर्षांपूर्वी झालेली असावी, बँक खाते किमान एक वर्ष सक्रिय असावे आणि वार्षिक उलाढाल किमान ५० हजार रुपये असणे बंधनकारक आहे. जमीन वाटपासाठी सदस्यसंख्येनुसार निकष आहेत. १० महिला सदस्य असल्यास एक हेक्टर, २० सदस्यांच्या संस्थेला दोन हेक्टर, तर ग्रामसंघाला कमाल पाच हेक्टरपर्यंत जमीन भाडेपट्ट्याने देणार आहे.

## आ.सुलभा ताई खोडके यांच्या प्रश्नावर

# डफरीनच्या ४०० खाटांच्या रुग्णालयात डॉक्टर-परिचारिकांची पदस्थापना लवकरच

### आरोग्यमंत्र्यांची बैठकीची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती :**

अमरावतीतील ४०० खाटांच्या नवीन जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) येथे डॉक्टर व परिचारिकांच्या रिक्त पदांचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता आहे. आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी पदस्थापनेबाबत स्वतंत्र बैठक घेण्याची घोषणा केली.डफरीन रुग्णालयात अमरावतीसह ग्रामीण भाग, मेळघाट, धारणी तसेच मध्यप्रदेश सीमावर्ती भागातील महिला उपचार व प्रसूतीसाठी येतात. २०२४ मध्ये ४०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय सुरू झाले असले तरी डॉक्टर व परिचारिकां




च्या कमतरतेमुळे आरोग्यसेवेवर ताण निर्माण झाला आहे. यासंदर्भात शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा करत आमदार खोडके यांनी पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा पुन्हा उपस्थित केला. त्यावर आरोग्यमंत्री आबिटकर यांनी रिक्त पदे भरण्याबरोबरच आवश्यक नवीन पदेही प्रस्तावित करण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच डफरीन, इर्विन आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयांतील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी सभागृहात स्पष्ट केले.राष्ट्रीय डॉक्टर दिनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या घोषणेमुळे डफरीन रुग्णालयाला लवकरच आवश्यक वैद्यकीय मनुष्यबळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून महिला रुग्णांना अधिक दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त आष्टीकर यांच्या कथित आर्थिक अनियमिततेची चौकशी सुरू;

## सेवानिवृत्त न्यायाधीश सुदाम देशमुख यांची नियुक्ती

### नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्या उपोषणाच्या इशाऱ्यानंतर मनपाची कारवाई; आठ आठवड्यांत अहवाल सादर होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती :**

महानगर पालिकेचे तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक डॉ. प्रवीण आष्टीकर यांच्या कार्यकाळातील सुमारे १०० कोटी रुपयांच्या कथित आर्थिक अनियमिततेच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुदाम पी. देशमुख यांची एकसदस्यीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. समितीला आठ आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.या प्रकरणी नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी सातत्याने पाठपुरावा करत आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.

त्यानंतर प्रशासनाने चौकशी प्रक्रियेला गती दिल्याने हे त्यांच्या आंदोलनाचे महत्त्वाचे यश मानले जात आहे.मनपाच्या २० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ३३ व ३५ मंजूर करून सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला होता.



त्यानुसार मुख्य विधी अधिकारी श्रीकीतसिंह चव्हाण यांनी नियुक्ती आदेश जारी केला.चौकशीत बांधकाम विभागातील निविदा प्रक्रिया, जिओ-टॅगिंगच्या अटी, विकासकामांचे क्लबिंग, बायोमायनिंग प्रकल्प, १० लाखांवरील कामांमध्ये ई-टेंडर प्रक्रिया टाळल्याचे आरोप, केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे कथित उल्लंघन तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे मनपाच्या नावावर दाखविल्याच्या आरोपांची तपासणी केली जाणार आहे.चौकशी अधिकाऱ्यांना संबंधित फाईल्स, निविदा कागदपत्रे, पेमेंट रेकॉर्ड आणि प्रशासकीय नोंदी तपासण्याचे अधिकार देण्यात आले असून, आवश्यकतेनुसार अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार तसेच लोकप्रतिनिधींचे जबाबही नोंदविण्यात येणार आहेत.या प्रकरणामुळे यापूर्वी मनपाच्या दोन सर्वसाधारण सभांमध्ये मोठा गदारोळ झाला होता. आता चौकशी अहवालातून आरोपांमध्ये तथ्य आहे की नाही, हे स्पष्ट होणार असल्याने शहरातील राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष या अहवालाकडे लागले आहे.-

# आसेगाव पूर्णा टी-पॉईंटवर शेतकऱ्यांचा रास्ता रोको

### कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** अमरावती-परतवाडा राज्य मार्गावरील आसेगाव पूर्णा टी-पॉईंट येथे लोकविकास संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. गोपाल भालेराव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो शेतकरी सहभागी झाले.सरसकट शेतकरी कर्जमाफी, पिकविमा योजनेचा लाभ, शेतीमालाला हमीभाव तसेच इतर प्रलंबित मागण्या तातडीने मंजूर कराव्यात, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी काही काळ रस्त्यावर ठिय्या देत जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे राज्य मार्गावरील वाहतुकीवर अल्पकाळ परिणाम झाला.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आंदोलनस्थळी बंदोबस्त तैनात करून परिस्थिती नियंत्रणात ठेवली. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अन्यथा आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला.-

# तीन दशकांच्या अनुभवी शिक्षकांवर टीईटीची सक्ती; जिल्ह्यात नाराजीचा सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती :** -जिल्हा परिषद शाळांमध्ये अनेक वर्षांपासून सेवा बजावणाऱ्या शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य करण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. निवड मंडळाच्या परीक्षेत पात्र ठरून सेवेत दाखल झालेल्या आणि ३० ते ३१ वर्षांहून अधिक काळ अध्यापन केलेल्या शिक्षकांनाही निवृत्तीच्या




उंबरठ्यावर पुन्हा पात्रता सिद्ध करण्यासाठी परीक्षा द्यावी लागणार आहे.शिक्षकांचे म्हणणे आहे की, आयुष्यभर विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी आणि दुर्गम भागातही निष्ठेने सेवा बजावल्यानंतर त्यांच्या अनुभवावर प्रश्नचिन्ह उभे करणे योग्य नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी निकष आवश्यक असले तरी प्रदीर्घ सेवेनंतर पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय अन्यायकारक असल्याची भावना व्यक्त होत आहे.याशिवाय शिक्षकांवर अध्यापनासोबतच निवडणुका, जनगणना, विविध सर्वेक्षणे, शासकीय मोहिमा, ऑनलाइन माहिती भरणे आणि अहवाल सादर करणे अशा अनेक अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा भार आहे. त्यामुळे टीईटीसाठी अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली आहे.टीईटी अनिवार्य झाल्यानंतर अनेक शिक्षक मानसिक तणावाखाली असून, शाळेचे काम, कुटुंबीयांची जबाबदारी आणि परीक्षेची तयारी यांचा समतोल साधणे कठीण जात असल्याचे सांगितले जात आहे.शिक्षक राजेश सावरकर यांनी शासनाने अनुभवी शिक्षकांचा सेवाकाळ, कार्यक्षमता आणि अनुभवाचा विचार करून न्याय्य निर्णय घ्यावा, तसेच परीक्षा लादण्याऐवजी प्रशिक्षण, अभ्यासासाठी वेळ आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे.

# काळ्याकुट्ट तेलात समोसे, वडे, भजी तळणाऱ्यांवर आता होणार कारवाई !

### अन्न व औषध प्रशासनाचा कठोर इशारा : वापरलेले खाद्यतेल ठरणार ’घातक कचरा’

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती** हॉटेल्स चौकाचौकात असलेल्या नास्त्याकिंवा अगदी मिठाईच्या दुकानांमध्ये एकाच खाद्यतेलाचा वारंवार वापर करून त्यात वडे, भजी, समोसे तळण्याचा जीवघेणा खेळ सुरू आहे. अनेकदा हे तेल काळेकुट्ट होईपर्यंत वापरले जाते. मात्र, अशा वापरलेल्या तेलाचा पुनर्वापर करणे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक असून, प्रशासनाने आता याविरोधात कंबर कसली आहे. अशा तेलाला आता ’घातक कचरा’ म्हणून वर्गीकृत करण्यात आले असून, त्याचा पुनर्वापर करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा अमरावती येथील अन्न व औषध प्रशासनाचे दिला आहे.त्से परिपत्रक ही काढण्यात ाले आहे. वापरलेले



तेल कमी किमतीत लहान विक्रेत्यांना विकणे किंवा तेच तेल पुन्हा-पुन्हा वापरणे हा अन्न सुरक्षा कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे. या मोहिमेमुळे आता सलग तेल उकळणाऱ्या हॉटेलचालकांचे धाबे दणाणले आहेत.

**घरातही तेलाचा पुनर्वापर टाळा-** हा धोका फक्त हॉटेलपुरता मर्यादित नाही. घरातही एकदा तळलेले तेल पुन्हा-पुढी वापरण्याची महिलांची सवय असते. घरातही तेल जास्तीत जास्त एकदाच पुनर्वापरात आणावे (तेही फक्त भाजीसाठी). पुरी किंवा भजी तळलेले तेल पुन्हा नव्याने तळण्यासाठी कधीही वापरू नका, घरामध्येही आजारांना आमंत्रण देणारी ही सवय तातडीने बदलणे गरजेचे आहे.

अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत, दोषी विक्रेत्यांवर कडक कारवाईची तरतूद आहे. एफडीएचे अधिकारी आता हॉटेलमधील तेलाची येट ’टीपीसी मीटर’द्वारे जागेवरच नपासणी करणार आहेत. तेल दूषित आढळल्यास मालकाचा परवाना रद्द होऊ शकतो, तसेच अन्नपदार्था जप्त करून दोन लाखांपासून ते पाच लाख रुपयांपर्यंत दंड आणि गंभीर प्रकरणात तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

# जिल्हा बँक निवडणुकीचा बिगूल;४ ऑक्टोबरला कार्यकाळ संपणार

## २२ जुलैपर्यंत प्रतिनिधी ठराव सादर करण्याचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१अमरावती :**

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचा पाच वर्षांचा कार्यकाळ ४ ऑक्टोबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. निवडणूक प्रक्रियेचा पहिला टप्पा सुरू झाला असून, पात्र संलग्न सभासद संस्थांकडून प्रतिनिधींचे ठराव मागविण्यात आले आहेत. हे ठराव २२ जुलैपर्यंत संबंधित उपनिबंधक किंवा सहायक निबंधक कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.जिल्हा बँक ’अ’ वर्गातील सहकारी संस्था असल्याने तिची निवडणूक प्रक्रिया विभागीय सहनिबंधकांच्या नियंत्रणाखाली पार पडते. प्रतिनिधींच्या ठरावांची तपासणी झाल्यानंतर प्रारूप मतदार यादी तयार केली जाणार असून त्यानंतर निवडणुकीचे पुढील वेळापत्रक जाहीर होईल.सध्या आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ कार्यरत आहे. प्रस्थापितांना धक्का देत त्यांनी जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात प्रवेश केला आणि बहुमताच्या जोरावर अध्यक्षपद




मिळविले होते. आता त्यांचा कार्यकाळ संपत असल्याने नव्या संचालक मंडळासाठी राजकीय आणि सहकार क्षेत्रात हालचालींना वेग आला आहे.दरम्यान, शासनाच्या नव्या अध्यादेशामुळे सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या दहा विद्यमान संचालकांना यावेळी निवडणूक लढविता येणार नसल्याची शक्यता आहे. त्यामुळे अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र या अध्यादेशाविरोधात संबंधित युनियनने न्यायालयात याचिका दाखल केली असून, त्यावरील निर्णयाकडे इच्छुक उमेदवार आणि सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी गौतम वर्धन यांनी सर्व पात्र सभासद संस्थांना २३ जून ते २२ जुलैदरम्यान संचालक मंडळाची बैठक घेऊन प्रतिनिधी नियुक्तीचा ठराव मंजूर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या ठरावांच्या आधारे अंतिम मतदार यादी तयार होणार असल्याने ही प्रक्रिया निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळात वैयक्तिक सभासद, सॅलरी अर्नर्स, राखीव प्रवर्ग आणि संलग्न संस्थांचे प्रतिनिधी अशा विविध प्रवर्गांमधून एकूण २१ संचालकांची निवड केली जाते. त्यामुळे आगामी निवडणुकीकडे जिल्ह्यातील सहकार आणि राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले असून, येत्या काही आठवड्यांत उमेदवारी, आघाड्या आणि राजकीय समीकरणांना वेग येण्याची चिन्हे आहेत.